# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 12/05/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### मोटारपंप चोरी

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा खुमापरी शिवार येथे दिनांक ०९/०५/२०२३ चे १६/०० वा. ते दिनांक १०.०५.२०२३ चे १६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विलास चिनबाजी गणोरकर, वय ५२ वर्ष, रा. मोहपा यांची खुमारी शिवारातील तलावात सिआर कंपनीची ५ एच. पी पावरची मोटारपंप अंदाजे १५ वर्ष जुनी किंमती अंदाजे ५०००/— रू. ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास एएसआय रॉय मो. नं. ७८२०८९७१२० हे करीत आहे.

### ॲल्युमीनीयमचे विद्युत तार चोरी

**पो.स्टे. बेला** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा आलागोंडी येथे दिनांक २८/०४/२०२३ चे १०/०० वा. ते दिनांक ११/०५/२०२३ चे ११/१० वा. दरम्यान फिर्यादी नामे— धर्मपाल हंसाराम चोखांद्रे, वय ४५ वर्ष, रा. टेकडी खडगाव रोड नागपुर यांनी ॲल्युमीनीयमचे विद्युत तार अवकाळी पावसाळयामुळे जमिनीला टेकुन व लोखंडी पोल वाकल्यामुळे पडलेल्या ज्याची लांबी ८००—८०० फुटाचे दोन तारेचे तुकडे एकुण १६०० फुट लांबीचे ज्याची किंमती अंदाजे १२०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात ईसमाने कापुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. निमगडे मो. नं. ८९९९९१७११२ हे करीत आहे.

### घरफोडी

**१) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा पाचगाव ता. उमरेड येथे दिनांक १०/०५/२०२३ चे २१.०० वा. ते दिनांक ११/०५/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— गणेश मारोती नांदुरकर, वय ४८ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ पाचगाव ता. उमरेड जि. नागपुर हा आपले किराणा दुकान दि. १०/०५/२०२३ चे २१/०० वा. बंद करून घरी गेला नंतर दि. ११/०५/२०२३ चे सकाळी ०८/०० वा. दुकान उघडायला गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने लोखंडी शटरला लागलेले कुलुप तोडुन दुकानाच्या आत प्रवेश करून दुकानामधील कांउटरच्या ड्राव्हरमधील व लोखंडी आलमारीमध्ये ठेवलेले एकुण १०,०००/—रूपयाचा मुद्देमाल चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. १५८९ संजय कुलकर्णी पोस्टे कुही मो. नं. ९४२२८१८०६२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील सिंगोरी मौदा येथे दिनांक १०/०५/२०२३ चे २१.०० वा. ते दिनांक ११/०५/२०२३ यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे— इंद्रपाल राधेशाम भोंडे, वय २७ वर्ष, रा. सिंगोरी यांचे घराचा लॉक तोडुन घराच्या आत प्रवेश करुन फिर्यादीचे बेडरुम मध्ये ठेवलेले लोखंडी आलमारीचे लॉकर मधील १) सोन्याची ५ ग्रॅमची अंगठी अंदाजे किंमती २०,०००/— रु २) सोन्याचे कानातले ३ जोड प्रत्येकी वजन ३ ग्रॅम किंमती अंदाजे २५,०००/— रु ३) एक सोन्याची नथ दिड ग्रॅम वजनाची किंमती अंदाजे ५,०००/—रु. ४) सोन्याच्या ५ जोड मनगटया किंमती अंदाजे ८,०००/—रु ५) चांदीच्या २ जोड पायपट्ट्या किंमती अंदाजे १०००/—रु ६) चांदीचे २ जोड पायघोळ किंमती अंदाजे १०००/—रु ७) चांदीच्या अंगठया एकुण ९ नग किंमती अंदाजे १५,०००/—रु ८) चांदीचे हातातले कडे २ नग किंमती अंदाजे १०००/—रु ९) नगदी ५०००/—रु. असा एकुण ६७,५००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने घरफोडी करुन चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भगवान चांदेवार ब. नं. ४४२ मो क्र. ९७६५२२१११६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**